RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक २०(२)] मंगळवार, जून ३०, २०२६/आषाढ ९, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **३० जून, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम, **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLV OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४८ मध्ये, खंड (१) मधील परंतुकास, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :— १९५८ चा ६०.

"स्पष्टीकरण.— या परंतुकाच्या तरतुदी, विक्री करारनाम्यासाठी जितके मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे तितक्याच रकमेचे मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असलेल्या, विकास करारासह, इतर कोणत्याही संलेखांना लागू होणार नाही.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ४८ च्या खंड (१) च्या परंतुकामध्ये अशी तरतूद आहे की, जेव्हा मालमत्तेचा ताबा घेण्यापूर्वी, कोणत्याही कारणांस्तव, विक्री करारनामा, त्याच्या निष्पादनाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत नोंदणीकृत रद्दबातल विलेखाद्वारे रद्द केला असेल त्या बाबतीत, रद्दबातल विलेखाच्या नोंदणीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत, कलम ४७ अन्वये परताव्यासाठी अर्ज करता येईल.

**२.** विकास करारनामे, विक्री प्रमाणपत्र, भाडेपट्टा करारनामा, इत्यादींसारख्या संलेखांवर देखील, उक्त अधिनियमाच्या अनुसूची-एक च्या विविध अनुच्छेदांनुसार, विक्री करारनाम्याप्रमाणे मुद्रांक शुल्काची तितकीच रक्कम आकारणीयोग्य असते. जर संलेख रद्द केले असतील, प्रत्याहृत केले असतील, विखंडित केले असतील किंवा संपुष्टात आणले असतील तर, अशा संलेखांच्या बाबतीत, मुद्रांक शुल्काची रक्कम, विक्री करारनाम्याइतकीच असल्यामुळे प्रदान केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी उक्त परंतुकान्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केले जातात. उक्त परंतुकान्वये विक्री करारनामाच्या बाबतीत परतावा मंजूर करण्यामागील उद्देश, जेथे असा करारनामा निष्पादित केल्यानंतर आणि मुद्रांक शुल्क प्रदान केल्यानंतर देखील मालमत्तेचा ताबा घेतलेला नसेल आणि असा करारनामा रीतसर रद्द केला असेल तेथे, वैयक्तिक खरेदीदारांना, मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देणे हा आहे.

**३.** म्हणून, महसुलाच्या हिताच्या दृष्टीने, उक्त कलमात सुयोग्य सुधारणा करून, उक्त अधिनियमाच्या कलम ४८ च्या खंड (१) च्या परंतुकातील तरतुदी, विक्री करारनाम्यासाठी जितके मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे तितक्याच रकमेचे मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असलेल्या, विकास करारासह, इतर कोणत्याही संलेखांना लागू असणार नाही, हे स्पष्ट करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २९ जून, २०२६.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ३० जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.